**प्रस्तावना :-** घनकचरा प्रकल्प अहवालानुसार ३ युनिट डंपर टिपर उपलब्ध करुन घेणेकामी प्राप्त झालेल्या निविदाकार व निविदाकारांनी सादर केलेल्या खर्चास मा.प्रशासक तथा आयुक्त सो.यांची मान्यता मिळणे बाबत.

घनकचरा प्रकल्प अहवालानुसार ३ युनिट डंपर टिपर हे केंद्र शासन जीईएम पोर्टलवर निविदा मागविणेसाठी होणा-या खर्चास मा.आयुक्त सो. यांनी दि.९/०३/२०२३ रोजी मान्यता दिली असता दि.०६/०३/२०२३ ते दि.१६/०३/२०२२ या कालावधीत निविदा प्रसिद्ध केली असता याकामी १ निविदाकार प्राप्त झाली असता दि.१६/०३/२०२३ ते दि.२३/०३/२०२३ या कालावधी मुदतवाढ करण्यात आली असता ०३ निविदाकार प्राप्त झाले असल्याचे केंद्र शासनाच्या जीईएम पोर्टलवर निदर्शनास आले होते.

केंद्र शासन जीईएम पोर्टलवर ३ युनिट डंपर टिपर उपलब्ध होणेसाठी प्राप्त ३ निविदाकार यांनी निविदेच्या अटी-शर्तींनुसार आवश्यक कागदपत्रांची पुर्तता मा.निविदा समिती समक्ष करण्यात आली असता ३ निविदाकार पात्र ठरविण्यात आली. पात्र ३ निविदाकार यांचे आर्थिक बोलींचा (लिफाफा क्र.२) लिफाफा खुले करण्यात आले असता खालील प्रमाणे त्यांनी एकुण खर्च सादर केले आहे.

| कामाचा तपशील | मे. ALFLAH MANUF ACTURING COMPANY, RAJASTHAN | मे.P.S.Nature Green Tool & Machins p.Limited | मे. P.S.Udhyog. |
|---|---|---|---|
| घनकचरा प्रकल्प ३ युनिट डंपर टिपर उपलब्ध करुन घेणे बाबत. | ३ युनिट डंपर टिपर करिता एकूण खर्च रु.४६,१६,३५८/- | ३ युनिट डंपर टिपर करिता एकूण खर्च रु.४९,७६,७००/- | ३ युनिट डंपर टिपर करिता एकूण खर्च रु.४५,८९,६३७/- |

वरील तौलोनिक तक्त्याचे अवलोकन केले असता घनकचरा प्रकल्प अहवालानुसार ३ युनिट डंपर टिपर उपलब्ध करुन घेणे करिता मे. P.S.Udhyog. यांनी सर्वात कमी दराची निविदा रक्कम रु.४५,८९,६३७/- मात्र भरली आहे.

घनकचरा प्रकल्प अहवालानुसार ३ युनिट डंपर टिपर उपलब्ध करुन घेणेकरिता रु.४६,५०,०००/-इतक्या खर्चास मान्यता असुन जीईएम पोर्टलवरील प्राप्त खर्च रु.४५,८९,६३७/- मे. P.S.Udhyog. यांनी भरली आहे.सदर कामी प्राप्त झालेले दर हे निविदे मधील दरा पेक्षा रक्कम रु.६०,३६३/- इतकी रक्कमेने कमी भरली आहे.सद्यास्थितीत खर्चास मा.स्थायी समितीची मान्यता घेणेसाठी मा.स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ (क) नुसार संविदा होणेसाठी मा.प्रशासक तथा आयुक्त सो. यांची मान्यता मिळवी.ही विनंती.

**प्रशासकिय ठराव क्र.** ९८० **दि.** ३१/०५ /२०२३

घनकचरा प्रकल्प अहवालानुसार ३ युनिट डंपर टिपर उपलब्ध करुन घेणेकरिता मे. P.S.Udhyog. ,यांनी रु.४५,८९,६३७/- -असे दर सादर केले असून सादर केलेल्या निविदाकारक यांना व त्यांनी सादर केलेल्या खर्चास मा.प्रशासक तथा आयुक्त सो.यांची मान्यता मिळणे बाबत विभागाने शिफारस केली आहे.

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.एमसीओ २०२०/प्र.क्र.७१ (भाग२)/ नवि,दि.६/०६/२०२२ नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ४५२ अ (१अ) व १ (ब) च्या तरतुदी नुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी विजयकुमार म्हसाळ प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका,घनकचरा प्रकल्प अहवालानुसार ३ युनिट डंपर टिपर उपलब्ध करुन घेणेकरिता केंद्रशासनाच्या GEM पोर्टलवर मे. P.S.Udhyog. ,यांनी रु.४६,५०,०००/- सर्वात कमी असलेले दर हे मनपाच्या अंदाजपत्रकिय दरापेक्षा कमी दराच्या (रु.४५,८९,६३७/-) निविदेस मंजुरी देत आहे.

**(विजयकुमार म्हसाळ)**

**प्रशासक तथा आयुक्त,**

**भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका**

प्रस्तावना :- घनकचरा प्रकल्प अहवालानुसार ४ युनिट पाण्याचे टॅकर उपलब्ध करुन घेणेकामी प्राप्त झालेल्या निविदाकार व निविदाकारांनी सादर केलेल्या खर्चास मा.प्रशासक तथा आयुक्त सो. यांची मान्यता मिळणे बाबत.

घनकचरा प्रकल्प अहवालानुसार ४ युनिट पाण्याचे टॅकर हे केंद्र शासन जीईएम पोर्टलवर निविदा मागविणेसाठी होणा-या खर्चास मा.आयुक्त सो.यांनी दि.९/०३/२०२३ रोजी मान्यता दिली असता दि.०६/०३/२०२३ ते दि.१६/०३/२०२२ या कालावधीत निविदा प्रसिद्ध केली असता याकामी १ निविदाकार प्राप्त झाली असता दि.१६/०३/२०२३ ते दि.२३/०३/२०२३ या कालावधी मुदतवाढ करण्यात आली असता सदर निविदेसाठी पुन्हा एकच निविदाकार प्राप्त झालेचे दिसुन आले असता दि.२४/३/२०२३ ते दि.३/४/२०२३ रोजी याकालावधीत निविदा मागविले असता ०२ निविदाकार प्राप्त होवुन प्राप्त २ निविदाकार यांचे लिफाफा क्र.२ खुले करण्यात आले असता प्राप्त दरांचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| कामाचा तपशील | मे. P.S.UDHYOG | मे.MAURYA MOTORS PRIVATE LIMITED. |
|---|---|---|
| घनकचरा प्रकल्प ४ युनिट पाण्याचे टॅकर उपलब्ध करुन घेणे बाबत. | ४ युनिट पाण्याचे टॅकर करिता एकूण खर्च रु.९९,४०,०००/- | ४ युनिट पाण्याचे टॅकर करिता एकूण खर्च रु.१,४४,४०,०००/- |

वरील तौलोनिक तक्त्याचे अवलोकन केले असता घनकचरा प्रकल्प अहवालानुसार ४ युनिट पाण्याचे टॅकर उपलब्ध करुन घेणेकरिता मे. PS.UDHYOG यांनी याकामी रु.९९,४०,०००/- इतकी रक्कम सादर केली आहे.

घनकचरा प्रकल्प अहवालानुसार ४ युनिट पाण्याचे टॅकर उपलब्ध करुन होणेकरिता रु.९८,४१,८००/-इतक्या खर्चास मान्यता असुन जीईएम पोर्टलवरील प्राप्त खर्च रु.९९,४०,०००/- मे.**P.S.UDHYOG** यांनी निविदे मधील दरा पेक्षा रक्कम रु.९८,२००/- इतकी रक्कमेने जास्त भरली असून वाटाघाटी अंती मनपाच्या अंदाजित दरा पेक्षा रु.१८४०/- इतकी म्हणजेच रु..९८,३९,९६०/- सादर केली आहे. सद्यास्थितीत मा.स्थायी समिती अस्तित्वात

नसल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ (क) नुसार संविदा होणेकरिता मा.प्रशासक तथा आयुक्त सो. यांची मान्यता मिळवी ही विनंती.

**प्रशासकिय ठराव क्र.** ९८९ **दि.**३१/०५ **/२०२३**

घनकचरा प्रकल्प अहवालानुसार ४ युनिट पाण्याचे टॅकर उपलब्ध करुन होणेकरिता मे.**P.S.UDHYOG** यांनी रु.९८,३९,९६०/- असे दर सादर केले असून सादर केलेल्या प्राप्त खर्चास व निविदाकाराक मा.प्रशासक तथा आयुक्त सो.यांची मान्यता मिळणे कामी विभागाने शिफारस केली आहे.

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.एमसीओ २०२०/प्र.क्र.७१ (भाग२)/ नवि,दि.६/०६/२०२२ नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ४५२ अ (१अ) व १ (ब) च्या तरतुदी नुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी विजयकुमार म्हसाळ प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका, घनकचरा प्रकल्प अहवालानुसार ४ युनिट पाण्याचे टॅकर उपलब्ध करुन घेणेकरिता केंद्रशासनाच्या GEM पोर्टलवर मे.**P.S.UDHYOG** यांनी ४ युनिट पाण्याचे टॅकर करिता रु.९८,३९,९६०/- इतकी रक्कम सादर केली असुन मनपाच्या अंदाजपत्रकिय दरापेक्षा कमी दराच्या (रु.९८,३९,९६०/-) निविदेस मंजुरी देत आहे.

**(विजयकुमार म्हसाळ)**

**प्रशासक तथा आयुक्त,**

**भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका**